**National Women's Council Report**

**(9 & 10 March 2022)**

National Women's Conference organized by RUSA (Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan) and Tuljaram Chadurchand College, Baramati, held on March 9th and 10th, 2022. The conference was themed around *"Aajchi Stree Aajchi Savitri: Woman Today as Savitri Reborn"*, marking an important occasion for celebrating **International Women's Day** and the **Amrit Mahotsav of Independence**.

The focus of the conference was to celebrate the evolving role of women in society, drawing parallels with **Savitri**, a symbol of strength and resilience in Indian mythology, and highlighting how today's women continue to embody these virtues in modern times.

Well-known writer Sandhya Nare Pawar inaugurated this conference, senior social activist, journalist Dr. Lata Pratima Madhukar(Mumbai), President of Anekant Education Society, Mr. Jawahar Shah (Wagholikar) chair person were present for the same..Dr. Chandshekhar Murumkar delivered welcome speech. On this occasion, he explained the role behind the organization of the National Women's Council. Introduction of national conference by Seema Naik-Gosavi and Mrs.Sushama Sangai introduced the guests.

In her inaugural speech, writer Sandhya Nare-Pawar said that when she came to Institution, she felt like she had come to a center of knowledge. On the one hand, she drew the attention of the audience to the number of girls dropping out of school and the rate of child marriages in Patna. While speaking on the main theme of 'Today's Woman Amchi Savitri', she said that Krantijyoti Savitrbai Phule was a Karma Yogi, the proposed arrangement comes from her childhood collection Kavyaphule. The Til-gud ceremony organized by Savitribai, commentary in touchable and untouchable, to take people on her own shoulder to escape from plague, this is the work of Karma Yogini. In today's society, it seems to die to advocate such equality values, many viz.

Dr. Lata Pratibha Madhukar reviews women's activism from Gargi Maitreyi in Bijbhashan. The career of rebellious women unfolded. While narrating the history of women's movement, he presented the struggle success story of the first woman doctor, Anandibai Joshi. From Rakhmabai, Fatima Shaikh to tribal composer, poet Jacinta Kerkatta) highlighted the story of

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

bravery of tribal women. She also made a poignant comment on the farmers' movement in Haryana.

President of Anekanta Education Society Hon. Mr. Jawahar Shah (Wagholikar) said that the scope of women's achievements has increased from politics to the defense sector and mentioned that former Union Agriculture Minister Sharadraoji Pawarsaheb had taken an important role in implementing the National Women's Policy. The conference was organized on the inspirational theme 'Today's Woman Today's Savitri'. He expressed happiness about this.

In the first session, the writer Sandhya Nare Pawar spoke on the topic of 'Today's woman on the path of neo-bhakti', 'There was a sense of self-respect among Therigatha and saint poets. As the awareness of self-esteem should be seen in today's women, many women's motivators e.g. He arranged the path of devotion by giving.

Lata Bhise Sonwane, President of Indian Women's Federation, on the topic 'Participation of Women in Local Self-Government and Panchayat Raj' drew attention to the hard work of women in rural agricultural life. He regretted that women who bear the burden of agriculture and milk production are not getting the freedom and rights of property.

Social activist Kiran Moghe on 'Visible Women Invisible Labour' - The labor of hardworking women who do housework should be remunerated properly, women's labor is invisible. Productive labor is made invisible and women are neglected. He commented on this. Well-known nutritionist Sumedha Jalgaonkar presented the topic 'Women's Adventure' with demonstrations and guided that mental courage and self-confidence can prove the strength of women.

Social activist Kiran Moghe on 'Visible Women's Invisible Labour' - The labor of hardworking women who do housework should be remunerated properly, women's labor is invisible. Productive labor is made invisible and women are neglected. He commented on this. Well-known nutritionist Sumedha Jalgaonkar presented the topic 'Women's Adventure' with demonstrations and guided that mental courage and self-confidence can prove the strength of women.

On the second day, in the first session, Sadhana Khati informed everyone about the Women's Act 'Anti-Sexual Harassment of Women at Workplace Act (2013)' and explained the importance of law and safety.

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Well-known director Sunil Sukthankar, speaking on the topic of 'Image of women in the media', should not forget that women are 'persons' and 'human beings' while portraying women in advertisements, serials and films. The independent personality of women should be given space. Ornaments, costumes, culture, etc. Sublimation of things should be avoided. shed light on this.
Adv. Priya Gujar Mahadik said that Savitri in the digital media has taken on the responsibility of a counselor to a large extent during the Corona period.
National award winning actress Lata Kare through an interview in the last session
A breathtaking biography unfolded. Participants from Maharashtra as well as various colleges
Research papers of scholars were read on this occasion. Over 600 for the two-day national conference
Students participated. 50 research papers, 60 posters with specific themes in this conference
Submitted. 10 oral presentations were presented. Dr. Mukta Ambere, Dr. Hanumant Phatak, Dr. Vinayak Lashkar,Prof. Jaymala Jadhav, Dr. Ranjana Nemade, Prof. Bhimrao Torane, Dr. Shashank Mane, Prof. Deepali Anpat, Dr.Yogini Mule served as the chairperson of the session.
Introductory Vice Principal of the closing ceremony Dr. Done by Yogini Mule. Coordinating Secretary of the Council Dr. Seema Naik Gosavi reviewed the conference. College Principal Dr. presided over the closing ceremony. Dr.Chandrasekhar Murumkar, In his presidential address, he said that " women have enormous energy and potential, they should harness it. And remove the fear from their hearts and realize their potential to the fullest. 'Today's woman' is 'today's Savitri'. She can meet the challenges of the present situation". He expressed that belief. RUSA Coordinator Dr. Ajit Telve, Vice Principal Dr. Avinash Jagtap, Dr. Jagdish Deshpande, Dr. Ramchandra Sapkal, Dr. Yogini Mule, Registrar Shri. Got guidance from Abhinandan Shah.
Adv. Priya Gujar, Lata Kare, Dr. Ranjana Nemade was present on the platform. Co-coordinator of the Council Mrs. Sushma Sangai thanked everyone while anchoring by Dr. Megha Badve. College Principal Dr. Chandrasekhar Murumkar guided. Women Empowerment Committee members, professors, non-teaching staff, students got spontaneous response for the success of National Women's Council.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

# राष्ट्रीय महिला परिषद

## अहवाल

## दि. ९ व १० मार्च २०२२

### विषय - 'आजची स्त्री - आजची सावित्री'

### ' Woman Today as Savitri Reborn '

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जागतिक महिला दिनाचे औचित साधून राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) नवी दिल्ली व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण समितीच्यावतीने दि. ९ व १० मार्च २०२२ रोजी 'आजची स्त्री - आजची सावित्री' 'Woman Today as Savitri Reborn ' या विषयावर राष्ट्रीय महिला परिषद संपन्न झाली.

सुप्रसिध्द लेखिका संध्या नरे - पवार यांनी या परिषदेचे उद्‌घाटन केले तर बीजभाषक म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, मुक्त पत्रकार डॉ.लता प्रतिभा मधुकर, मुंबई या लाभल्या होत्या. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.जवाहर शाह (वाघोलीकर) अध्यक्षस्थानी होते. डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी स्वागत केले यावेळी त्यांनी राष्ट्रीय महिला परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. परिषदेच्या संयोजन सचिव डॉ.सीमा नाईक-गोसावी यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक सौ. सुषमा संगई यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

उद्‌घाटनपर भाषणात लेखिका संध्या नरे-पवार म्हणाल्या की, आपण महाविद्यालयात आलो तेव्हा एका ज्ञानकेंद्रामध्ये आलो आहोत असे वाटले. महाविद्यालयात मुलींचा निःसंकोच वावर दिसून आला याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले एकीकडे मुलींची शाळागळती व बालविवाहांचे प्रमाण या घटनांकडे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. 'आजची स्त्री आजची सावित्री' या मुख्य विषयावर बोलतांना त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या कर्मयोगिनी होत्या हे सांगतांना त्यांच्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहामधून कर्मवादी मांडणी प्रत्ययास येते. सावित्रीबाईंनी आयोजित केलेला तीळगुळ समारंभ, स्पृश्य- अस्पृश्य भेदामधील भाष्य, प्लेगसाठी स्वतःच्या खांदयावरून रूग्णास नेणे, अस्पृश्यांसाठी हौद खुला करणे इ. हे कर्मयोगिनीचे काम आहे. समाजात आजही अशा समता मूल्यांचा पुरस्कार करणे गरजेचे वाटते याची अनेक उदा. त्यांनी दिली.

डॉ.लता प्रतिभा मधुकर यांनी बीजभाषणात गार्गी - मैत्रेयी यांच्यापासून स्त्रियांच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेतला. बंडखोर स्त्रियांच्या कारकीर्दीचा पट उलगडला. स्त्रीचळवळीचा इतिहास सांगताना त्यांनी पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांची संघर्षमय यशोगाथा मांडून डॉ.रखमाबाई, फातिमा शेख यांपासून आदिवासी रचनाकार, कवयित्री जसिंता केरकट्टा यांच्यापर्यंत) आदिवासी स्त्रियांच्या शौर्याची कहाणी अधोरेखित केली. हरियानातील किसान आंदोलनावरही त्यांनी मार्मिक भाष्य केले.



TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI



Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

अध्यक्षीय भाषणात अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.जवाहर शाह (वाघोलीकर) यांनी महिलांच्या कर्तृत्वाचा परीघ राजकारणापासून ते संरक्षण क्षेत्रापर्यंत वाढला असल्याचं सांगत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदरावजी पवारसाहेब यांनी राष्ट्रीय महिला धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महत्वाची भूमिका घेतली असल्याचे नमूद केले. 'आजची स्त्री - आजची सावित्री' या प्रेरणादायी विषयावर ही परिषद आयोजित केली. याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

प्रथम सत्रांत लेखिका संध्या नरे - पवार यांनी 'नवभक्तीमार्गावरील 'आजची स्त्री' या विषयावर 'थेरीगाथा व संतकवयित्रींच्यामध्ये आत्मसन्मानाची जाणीव होती. तशी आत्मसंन्मानाची जाणीव आजच्या स्त्रियांमध्ये दिसली पाहिजे, यावर अनेक स्त्रीकर्तृत्वाची प्रेरक उदा. देऊन भक्तीमार्गाची त्यांनी मांडणी केली.

भारतीय महिला फेडरेशनच्या अध्यक्ष लता भिसे-सोनवणे यांनी 'स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राजमधील स्त्रियांचा सहभाग' या विषयावर ग्रामीण - कृषीजीवनातील स्त्रियांच्या कष्टाच्या कामाकडे सर्वांचे लक्ष वेधले. शेती व दुग्धउत्पादनाचा भार उचलणाऱ्या स्त्रियांना मात्र मालमत्तेचे स्वातंत्र्य व अधिकार मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

सामाजिक कार्यकर्त्या किरण मोघे यांनी 'दृश्य स्त्रिया - अदृश्य श्रम' या विषयावर घरकाम करणाऱ्या कष्टकरी स्त्रियांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा स्त्रियांच्या श्रमांना अदृश्य केले जाते. उत्पादक श्रमाचे अदृश्यीकरण केले जाते व स्त्रियांकडे दूर्लक्ष केले जाते. यावर त्यांनी भाष्य केले. सुप्रसिध्द आहारतज्ञ सुमेधा जळगावकर यांनी 'वुमन ॲडव्हेंचर' या विषयाची प्रात्यक्षिकांसहीत मांडणी केली व मानसिक धैर्य आणि आत्मविश्वास या गोष्टी माहिलांचे सामर्थ्य सिध्द करू शकतात यावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात साधना खटी यांनी 'कामाच्या ठिकाणी स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक छळ विरोधी कायदा (२०१३)' या महिलांविषयक कायदयाची माहिती सर्वांना करून दिली व कायदा आणि सुरक्षिततेचे महत्व सांगितले.

सुप्रसिध्द दिग्दर्शक सुनील सुकथनकर यांनी 'माध्यमातील स्त्री-प्रतिमा' या विषयावर बोलताना, जाहिराती, मालिका व चित्रपटांमध्ये स्त्रीची व्यक्तिरेखा साकारताना स्त्री ही 'व्यक्ती' व 'माणूस' आहे याचा विसर पडू देऊ नये. स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाला अवकाश द्यावा. अलंकार, वेशभूषा, संस्कृती, इ.गोष्टीचे उदात्तीकरण टाळावे. यावर प्रकाश टाकला.

ॲड. प्रिया गुजर- महाडिक यांनी कोरोना काळात डिजिटल माध्यमातील सावित्रींनी मोठया प्रमाणात समुपदेशकाची जबाबदारी निभावली असल्याचे सांगत कोरोना काळात महिलांच्या ताण -



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

तणावांचे व्यवस्थापन करणाऱ्या डिजीटल सावित्रींमुळेच मी माझ्या जीवनात सक्षमपणे उभारी घेऊ शकल्याचे प्रतिपादन केले.

शेवटच्या सत्रामध्ये राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त अभिनेत्री लता करे यांनी मुलाखतीद्वारे आपला चित्तथरारक जीवनपट उलगडला. महाराष्ट्रातून तसेच विविध महाविद्यालयातून सहभागी झालेल्या अभ्यासकांच्या शोधनिबंधांचे वाचन यावेळी झाले. दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी ६०० पेक्षा जास्त विद्यार्थी - विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. ५० शोधनिबंध, विशिष्ट थिम घेऊन ६० पोस्टर्स या परिषदेत सादर झाले. १० ओरल प्रेझेंटेशन सादर झाले.डॉ.मुक्ता आंभेरे, डॉ.हनुमंत फाटक, डॉ.विनायक लष्कर, प्रा.जयमाला जाधव, डॉ.रंजना नेमाडे, प्रा.भीमराव तोरणे, डॉ.शशांक माने, प्रा.दीपाली अनपट, डॉ. योगिनी मुळे यांनी सत्राध्यक्ष म्हणून काम पाहिले.

समारोप समारंभाचे प्रास्ताविक उपप्राचार्या डॉ.योगिनी मुळे यांनी केले. परिषदेच्या संयोजन सचिव डॉ.सीमा नाईक गोसावी यांनी परिषदेचा आढावा घेतला. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले की ''स्त्रियांच्यामध्ये प्रचंड उर्जा व क्षमता असून ती त्यांनी उपयोजनात आणावी. व मनातील भीती काढून स्वतःतील क्षमतेला पूर्णांशाने साकार करावे. 'आजची स्त्री' ही 'आजची सावित्रीच' आहे. सद्यःस्थितीतील आव्हाने ती पेलू शकते''. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.रूसा समन्वयक डॉ.अजित तेलवे, उपप्राचार्य डॉ.अविनाश जगताप, डॉ.जगदीश देशपांडे, डॉ.रामचंद्र सपकाळ, डॉ.योगिनी मुळे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा यांचे मार्गदर्शन मिळाले.

ॲड.प्रिया गुजर, लता करे, डॉ.रंजना नेमाडे व्यासपीठावर उपस्थित होत्या. परिषदेच्या सहसमन्वयक सौ.सुषमा संगई यांनी सर्वांचे आभार मानले तर डॉ.मेघा बडवे यांनी सूत्रसंचालन केले. अ.ए.सो.चे सन्माननीय पदाधिकारी यांचे पाठबळ मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय महिला परिषदेच्या यशस्वितेसाठी महिला सक्षमीकरण समिती सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

| सौ.सुषमा संगई<br>सहसमन्वयक | डॉ.सीमा नाईक-गोसावी<br>संयोजन सचिव | डॉ.अजित तेलवे<br>रूसा-समन्वयक | डॉ.चंद्रशेखर मुरूमकर<br>प्राचार्य व समन्वयक |
|---|---|---|---|

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# National Women Conference on Ajchi Stree Ajchi Savitri (Women Today as Savitri Reborn) dated 09/03 – 10/03/2022




Mrs. Sandhya Nare-Pawar




Shrimati Lata Kare

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

## परिषदेची काही क्षणचित्रे...



प्रोस्टर प्रदर्शन उद्घाटन करताना सामाजिक कार्यकर्त्या मा.डॉ.लता प्रतिभा मधुकर, लेखिका मा.संध्या नरे-पवार व प्राचार्य, मान्यवर.




बीजभाषक व सामाजिक कार्यकर्त्या डॉ.लता प्र.म. यांचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.जवाहर शाह (वाघोलीकर), मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, प्रमुख पाहुण्या मा.संध्या नरे-पवार.



अनेकान्त रिसर्च जर्नलचे 'ऑनलाईन प्रकाशन' संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.जवाहर शाह (वाघोलीकर), मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर,व मान्यवर.



महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना.




प्रसिध्द दिग्दर्शक मा.सुनील सुकथनकर यांचे स्वागत करताना रजिस्ट्रार श्री.अभिनंदन शहा व मान्यवर.



सामाजिक कार्यकर्त्या - मा.लता भिसे-सोनवणे, मा.किरण मोघे मार्गदर्शन करताना.




राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त अभिनेत्री मा.लता करे, ॲड. प्रिया गुजर, मा.सुमेधा जळगावकर व अन्य मान्यवर.



सामाजिक कार्यकर्त्या - मा.किरण मोघे व मा.साधना खटी मार्गदर्शन करताना.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

# Book Inauguration






# Poster Presentation Inauguration



